| CNR No. MHRG080002232026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २०/२०२६**<br>सुनीता वामन गायकवाड<br>**विरूध्द**<br>सरकार/खालापूर पोलीस स्टेशन |
|---|---|

## निशाणी क्र. १ वरील आदेश.

१. सदरचा अर्ज अर्जदार सुनिता वामन गायकवाड यांनी यांनी **''भारतीय न्याय संहिताचे कलम ५०३''** अन्वये मुद्देमाल परत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्जदार ह्या माडपवाडी, ता. खालापूर, जि. रायगड येथील रहीवासी आहेत. अर्जदार यांनी त्यांच्या घरी चोरी झाल्याबाबत गु.र.क्र. ४०१/२०२५ हा खालापूर पोलीस स्टेशन येथे नोंद केला आहे. सदर गुन्ह्यातील मुद्देमाल सोन्याचे मणी हे खालापूर सी.आर. क्र. ४०१/२०२५, बी.एन.एस. कलम ३०५(ब), ३३१(२) मध्ये खालापूर येथील पोलीसांनी जप्त केलेले आहेत. अर्जदारचे असे कथन आहे की, आरोपी यांनी अर्जदार यांचे बंद घराचा दरवाजाचे कडी कोयंडा यास लावलेले लॉक तोडुन आत मध्ये प्रवेश करुन कपाटील लॉकर मधील रु. ५८५८/- किंमतीचे लहान मोठे आकाराचे ०.४८० मि.ली. ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी व रु. २०,०००/- भारतीय चलनातील रु. ५००, २०० व १०० दराच्या नोटा एकुण किंमत २५,८५८/- चोरी करुन दरवाजाचे कडी कोयडा यास नवीन लॉक लावून पळुन गेले व सदर चोरी झालेल्या मुद्देमालापैकी लहान मोठे आकाराचे ०.४७० मि.ली. ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी पोलीसांनी आरोपींकडून जप्त केले आहेत त्यामुळे ती मालमत्ता परत मिळण्यासाठी अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रस्तूतचा अर्जावर सरकारी वकील व तपासी अंमलदार यांचे म्हणणे

मागविले. तपासी अंमलदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, सदर गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेले रक्कम रु. ५८५८/– किंमतीचे लहान मोठे आकाराचे ०.४७० मि.ली. ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी हे अर्जदार यांच्या ताब्यात योग्य त्या अटी व शर्तींवर देण्यास तपासी अंमलदार यांची हरकत नाही. सरकारी वकील यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, सदरचा मुद्देमाल हा गंभीर व अजामिनपात्र स्वरुपाच्या गुन्ह्यात पोलीसांनी जप्त केलेला आहे. सदरचा मुद्देमाल अर्जदार यांच्या ताब्यात दिल्यास अर्जदार त्याची विक्री, हस्तांतरण किंवा त्याच्यात बदल करुन सोन्याच्या दागिन्याचे स्वरुप बदलण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्याचा सदर केसवर व पुराव्यावर विपरीत परीणाम होईल त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. मी अर्जदारच्या अर्जाचे, शपथपत्राचे तसेच तपासी अंमलदार व सरकारी वकील यांनी दिलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले, युक्तीवाद ऐकला. अर्जदारने त्याच्या कथनांना पुष्टी देण्यासाठी निशाणी क्र.४ वरील कागद यादी सोबत गुन्हा रजिष्टर नं.४०१/२०२५ ची झेरॉक्स प्रत, अर्जदारच्या आधार कार्डची प्रमाणीत प्रत व सोन्याचे मणी खरेदी केल्याच्या बीलाची झेरॉक्स प्रत ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तरी सदरचा मुद्देमाल हा अर्जदार यांच्याच मालकीचा आहे. त्यामुळे तो अर्जदार यांना परत देण्यात यावा. अर्जदारने निशाणी ४ वरील कागद यादी सोबत भैरव ज्वेलर्स यांच्याकडील बिलाची पावती दाखल केलेली आहे. त्यावरुन असे दिसून येते की, अर्जदार यांनी दि. १९/०१/२०२५ रोजी भैरवनाथ ज्वेलर्स येथुन ०.४८० मि.ली. ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी रक्कम रु. ५८५८/– ला खरेदी केलेले आहे.

४. अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे तसेच अर्जदारच्या शपथ पत्राचे

अवलोकन केले असता, असे दिसून येते की, खालापूर पोलिस स्टेशन येथील गु.र.नं. ४०१/२०२५ हा गुन्हा भारतीय न्याय संहीता कलम ३०५(ब), ३३१(२) अन्वये दाखल आहे. या गुन्ह्यामध्ये खबर देणार सुनिता वामन गायकवाड ह्या आहेत. तपासी अंमलदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, त्यांनी या गुन्ह्याच्याकामी ५८५८/– रुपये किंमतीचे लहान मोठ्या आकाराचे ०.४७० मि.ली. ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी हा मुद्देमाल जप्त केलेला आहे. तपासी अंमलदार यांनी सदरचा मुद्देमाल अर्जदार यांच्या ताब्यात देण्यास त्यांची हरकत नाही असे कथन केले आहे. अर्जदार यांनी सदरचा मुद्देमाल त्यांच्या मालकीचा असल्याचे शपथेवर कथन केले आहे. सदर मुद्देमालाची मागणी अर्जदार यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही केलेली नाही. त्यामुळे सदरचा मुद्देमाल हा पोलिस स्टेशनमध्ये ठेवून कोणताही उद्देश साध्य होणार नाही. सदर प्रकरण न्यायालयात सुरू होण्यास कालावधी लागणार आहे. अशा परिस्थीत सदरचा मुद्देमाल हा त्यामध्ये कसलाही बदल न करता व तारखेस न्यायालया समोर आणण्याच्या अटीवर सोडणे न्यायोचित दिसून येते. सदरचा मुद्देमाल अर्जदारच्या ताब्यात दिल्यास अभियोगपक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब मी खालील आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. खालील अटी व शर्तीस आधीन राहून अर्जदार नामे सुनिता वामन गायकवाड यांना खालापूर पोलिस स्टेशन येथील गु.र.नं. ४०१/२०२५ मध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल रक्कम रुपये ५८५८/– किंमतीचे लहान मोठे आकाराचे ०.४७० मि.ली. ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी हा परत देण्यात यावा.

३. अर्जदारने रक्कम रुपये ५८५८/– (पाच हजार आठशे अठ्ठावन्न) चे

हमीपत्र/बंधपत्र द्यावे.

४. अर्जदारने सदरचा मुद्देमाल प्रस्तुत गुन्ह्याचा निकाल लागेपर्यंत कोणालाही विक्री, गहाण अथवा अन्य प्रकारे हस्तातरीत करु नये व मुद्देमालामध्ये कसलाही बदल करु नये.

५. न्यायालयाने आदेश दिल्यास अथवा तपासाच्या दृष्टीने आवश्यक्ता भासल्यास सदरचा मुद्देमाल हजर करावा.

६. अर्जदारने स्वतःच्या खर्चाने सदर मुद्देमालाचे चारही बाजूने फोटो काढून त्यावर काऊंटर सही करुन तपासी अधिकाऱ्याकडे जमा करावी. तपासी अधिकारी यांनीही सदर मुद्देमालाचा रितसर पंचनामा करावा.

७. तपासी अंमलदार यांनी मुद्देमालाचा केलेला पंचनामा व सुपूर्तनामा बॉड या केस मध्ये दाखल करावा.

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.03.10 18:53:47 +0530

(डी. एस. खोत )

स्थळ – खालापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

दिनांक – १०/०३/२०२६. कोर्ट क्र.२, खालापूर.